# शासकिय पुनर्नियुक्त माजी सैनिक संघटना, महाराष्ट्र राज्य

शासन मान्यता

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. संघटना १५१६/प्र.क्र.३१४/१६-अ, दिनांक ०३ सप्टेंबर २०१६.

# घटना व निवडणूक उपनियम

## (आदर्श नियमावली सुधारीत २०२२)

Scanned with CamScanner

# सादरीकरण

शासकिय पुनर्नियुक्त माजी सैनिक संघटनाची घटना व निवडणूक उपनियम हे घटना समितीने बनवून दिनांक ३० सप्टेंबर २०१८ रोजी आमसभेमध्ये मंजूर करण्यात आले. दिनांक २८ फेब्रुवारी २०१९ रोजी अधिवक्ता मा. अँड. श्री सतिश अमृतकर यांनी ही घटना व निवडणूक उपनियमांचे अभ्यास करुन ती कायदेशीर असल्याबाबत सत्यापन करण्यात आले. संघटनेने सदर घटनांची प्रत महाराष्ट्र शासनास व संघटनेच्या सर्व जिल्हयांना व सदस्यांना प्रसिद्वी माध्यमाव्दारे पाठविण्यात आली.

उपरोक्त घटना व निवडणूक नियमांमध्ये कालानुरुप बदलांची आवश्यकता असल्याचे मत संघटनेचे अध्यक्ष मा. बाजीराव देशमुख यांनी प्रकट केले व त्यास राज्य कार्यकारिणी यांनी मंजूरी देत बदल करणेसाठी प्रशासकिय समितीची नियुक्ती केली. सदर समितीच्या शिफारशी नुसार दिनांक ३० एप्रिल २०२२ व ०१ मे २०२२ रोजी सातारा येथे आयोजीत संघटनेच्या आमसभेत घटना व निवडणूक नियमांमध्ये काही बदल मंजूर करण्यात आले.

सदर मंजूर झालेले बदल हे मुळ घटनेत व निवडणूक उपनियमात समाविष्ट करुन नविन दुरुस्ती केलेली घटना निवडणूक नियमांसहची प्रत सादर करण्याची जवाबदारी आम्हांस दिलेली होती. या अनुषंगाने दिनांक १२ जुन २०२२ रोजी आम्ही नागपूर येथे बैठकीचे आयोजन करुन आमसभेत मंजूर केलेले बदल घटनेत समाविष्ट करुन नविन दुरुस्तीसह घटना व निवडणूक नियमांची प्रत संघटनेस आज दिनांक ०१ जुले २०२२ रोजी सादर करत आहोत.

**श्री कमलाकर अबासाहेब शेटे**
**अध्यक्ष**
**घटना समिती**

**श्री सुधाकर बापुराव तकित**
**सचिव**
**घटना समिती**

**शासकिय पुनर्नियुक्त माजी सैनिक संघटना, महाराष्ट्र राज्य**

Scanned with CamScanner

# सत्यापन

शासकिय पुनर्नियुक्त माजी सैनिक संघटनाची घटना व निवडणूक उपनियम हे घटना समितीने बनवून दिनांक ३० सप्टेंबर २०१८ रोजीच्या आम सभेमध्ये मंजूर करण्यात आले. दिनांक २८ फेब्रुवारी २०१९ रोजी अधिवक्ता मा. अँड. श्री सतिश अमृतकर यांनी ही घटना व निवडणूक उपनियमांचे अभ्यास करुन ती कायदेशीर असल्याबाबत सत्यापन करण्यात आले. संघटनेने सदर घटनाची प्रत महाराष्ट्र शासनास व संघटनेच्या सर्व जिल्हयांना व सदस्यांना प्रसिद्वी माध्यमाव्दारे पाठविण्यात आली.

उपरोक्त घटना व निवडणूक नियमांमध्ये कालानुरुप बदलाची आवश्यकता असल्याने दिनांक ३० एप्रिल २०२२ व ०१ मे २०२२ रोजी सातारा येथे आयोजीत संघटनेच्या आमसभेत घटना व निवडणूक नियमांमध्ये काही बदल मंजूर करण्यात आले.

सदर मंजूर झालेले बदल हे मुळ घटनेत व निवडणूक उपनियमात समाविष्ट करण्यात आले असुन संघटनेची दुरुस्ती केलेली सुधारीत घटना व आदर्श नियम परिपुर्ण व दोषरहीत असल्याबाबत सत्यापन करण्यात येत आहे.

**अध्यक्ष**
**शा. पु. मा. सै. सं.**
**महाराष्ट्र राज्य**

**सरचिटणीस**
**शा. पु. मा. सै. सं.**
**महाराष्ट्र राज्य**

Scanned with CamScanner

# शासकीय पुनर्नियुक्त माजी सैनिक संघटनेची घटना व नविन आदर्श नियम

१. नाव :- या संघटनेचे नाव "**शासकीय पुनर्नियुक्त माजी सैनिक संघटना**" असे आहे आणि पुढील नियमांमध्ये निर्देश " **संघटना** " असा करण्यात येईल.

२. **उदिष्टे:- संघटनेची उदिष्टे पुढीलप्रमाणे आहेत.**

(अ) महाराष्ट्र राज्यातील नागरी सेवेमध्ये नोकरीला असणा-या वर्ग "क" व वर्ग "ड" संवर्गातील माजी सैनिकांना संघटीत करणे व एकत्रित करणे, आणि

(ब) सदस्यांना जीवनात आणि सेवेत सुस्थिती मिळवून देणे.

(क) त्यांची गा-हाणी दूर करण्याचा प्रयत्न करणे.

(ड) शासन आणि त्यांचे कर्मचारी यांच्यामध्ये एकोप्याचे संबंध वाढीला लावण्याचा प्रयत्न करणे.

(ई) सदस्यांना आजार, अपंगत्व, वृध्दत्व आणि मृत्यु याविरूध्द तरतुद करण्यासाठी प्रयत्नशील राहणे. शासनाच्या कल्याणकारी योजनांचा प्रचार व प्रसार करणे.

(फ) आपल्या सदस्यांना त्यांच्या नोकरीमध्ये उपस्थित होणा-या किंवा नोकरीला अनुषंगीक असणा-या बाबीच्या संबंधात कायद्याचे सहाय्य देणे.

(ग) भारतातील शासकीय कर्मचा-यांच्या मान्यता प्राप्त संघटनासंबधीत माहिती मिळविणे व त्यांच्याशी समन्वय ठेवणे.

(ह) भारतातील समान उदिष्टे असणा-या, शासनाची मान्यता असणा-या शासकीय कर्मचा-यांच्या वर्ग-३ व ४ वर्ग च्या संघटनांशी सहकार्य करणे आणि तिच्याशी संहत (फेडरेट) होणे किंवा संलग्न होणे.

य) सदस्यांची सामाजिक, आर्थिक नागरी स्थिती सुधारण्यासाठी आवश्यक असे इतर उपाय सर्वसाधारणपणे योजणे.

(र) ही उदिष्टे साध्य करण्यासाठी संघटनेचे महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात व तालुक्यात केंद्र स्थापन करणे.

Scanned with CamScanner

३. **सदस्यत्व स्विकारणे.**

(अ) **सर्वसाधारण सदस्य** - महाराष्ट्र राज्य नागरी सेवेमध्ये नोकरीस असलेले माजी सैनिक १०००/- रु.इतकी प्रवेश फी व रू. ५००/- इतकी वार्षिक वर्गणी नियमित भरल्यानंतर संघटनेचा सर्वसाधारण सदस्य होण्यास पात्र ठरेल. मात्र, संघटना वेळोवेळी करील त्या नियमांचे आणि उपविधीचे अनुपालन करण्यास तिने / त्याने समंती दिली पाहिजे. सर्वसामान्य सभासदांनी आपली सदस्य नुतणीकरण वेळेवर प्रत्यक्ष संघटनेच्या कार्यालयात येऊन करणे बंधनकारक राहील.

(ब) **आजीवन सदस्य** -जे माजी सैनिक महाराष्ट्र राज्य नागरी सेवेत आहेत ते रु १०,०००/- देऊन आजिवन सदस्य होऊ शकतात. मात्र, संघटना वेळोवेळी करील त्या नियमाचे आणि उपविधीचे अनुपालन करण्यास तिने / त्याने समती दिली पाहीजे.

(क) **देणगीदार आजीवन सदस्य/देणगीदार**. शासकीय/निमशासकीय/बँका व इतर संस्थामधील माजी सैनिक यांना संघटनेचे आजीवन सदस्य होता येईल अशा सदस्यांना **"देणगीदार आजीवन सदस्य"** संबोधले जाईल. तसेच इतर सिव्हीलीयन/ संस्था यांही संघटनेला देणगी देवू शकतील अशा सर्वांना संघटनेचे **"देणगीदार"** संबोधले जाईल. देणगीदार आजीवन सदस्य व इतर देणगीदार यांना संघटनेच्या कुठल्याही कार्यात हस्तक्षेप करता येणार नाही व त्यांना मतदानाचा अधिकार, राज्यकार्यकारीणी/जिल्हा कार्यकारीणी पदावर नियुक्ती करता येणार नाही. उदा.१) जे पुनर्नियुक्त माजी सैनिक पोलीस दल अथवा तत्सम शासनाच्या सेवेत नियुक्त होतील व ज्या विभागास संघटना स्थापनेचे अधिकार नसतील अशा दलातील कार्यरत असलेल्या पुनर्नियुक्त माजी सैनिकास आजीवन देणगीदार सदस्य म्हणून संघटनेत समाविष्ट करता येईल तथापी त्यास कोणतेही पद दिले जाणार नाही. उदा.२) शासनाच्या सेवेतील वर्ग १ व वर्ग २ राजपत्रित अधिकारी यांना देखील संघटनेचे देणगीदार सभासद होता येईल, परंतू त्यांना कोणतेही संवैधानिक पद दिले जाणार नाही.

(ड) **देणगीदार आजीवन सदस्यांना संघटनेच्या आजीवन सदस्यात स्थलांतर करणे**. नियम ३ (क) अनुसार एखादा माजी सैनिक देणगीदार आजीवन सदस्य हे जर शासकीय नोकरीत नियुक्त झाला असेल व अशा सदस्यांनी संघटनेच्या आजीवन सदस्यसाठी विनंती अर्ज केला असेल तर अशा परिस्थीतीत राज्य कार्यकारीणीने त्यांच्या अर्जाचे अवलोकन करुन व सदर सदस्याचे देणगी रक्कम रु.१००००/- प्राप्त झाल्याची खात्री करुन त्यास संघटना घटना नियम ०३ (ब) अनुसार आजीवन सदस्याचा दर्जा देवू शकतील. अशा सदस्यास घटनेतील सर्व नियमांचे व उपविधीचे अनुपालन करणे संमतीपत्र देणे बंधनकारक राहील.

Scanned with CamScanner

(इ) **आजीवन सदस्य यांची पदोन्ती होऊन वर्ग 'अ' किंवा 'ब' राजपत्रित मध्ये गेल्यास त्यांचे सदस्यत्व व पदाबाबत.** शा.पु.नि.मा.सै. कर्मचारी संघटनेला शासनाने वर्ग ३ व वर्ग ४ माजी सैनिक कर्मचारी संवर्ग यांच्या प्रतिनिधीत्व करणेसाठी मान्यता प्रदान केलेली आहे. आजीवन सदस्य यांची जेव्हा पदोन्नती होऊन वर्ग 'अ' किंवा 'ब' या राजपत्रित संवर्गामध्ये गेल्यास त्यांचे संघटना सदस्यत्व व संघटनेच्या पदावर नियुक्ती बाबतची स्थितीबाबत असे स्पष्टीकरण करण्यात येत आहे की, असे सदस्य ज्यांनी वर्ग ३ व वर्ग ४ मध्ये असताना संघटनेसाठी आजीवन सदस्यत्व स्विकारुन संघटना वाढीसाठी अशा सदस्यांनी मदत केलेली आहे, अशा अनुभवी सदस्यांचा संघटनेसाठी लाभ होणेसाठी त्यांचे आजीवन सदस्यत्व कायम ठेवण्यात येत आहे. परंतू संघटनेचे संवैधानिक पदावर त्यांना राहता येणार नाही. राजपत्रित पदावर नियुक्त झालेल्या दिनांकापासुन त्यांचे पद रिक्त झाले असे गृहित धरले जाईल. अशा सदस्यांना राजपत्रित झाल्यामुळे संघटनेच्या पदाचा राजीनामा देणे बंधनकारक राहील. अशा सदस्यांची सेवा व अनुभवाचा लाभ घेण्यासाठी राज्य कार्यकारीणीला वाटल्यास अशा सदस्यांना योग्य त्या समितीवर, जसे- मंत्रालय कामकाज सुकर होण्यासाठीची समिती किंवा सल्लागार पदावर किंवा इतर योग्य त्या पदावर नियुक्ती देवून त्यांच्या सेवेचा लाभ घेवू शकते.

वरील (अ, ब, क, ड, इ) अन्वये जमा केलेली रक्कम कुठल्याही कारणास्तव पुर्ण किंवा अंशतः परत केली जाणार नाही.

सर्वसाधारण सदस्य / आजीवन सदस्य / देणगीदार यांच्या कडून आलेला संपुर्ण निधी जिल्हा संघटनेने दर ३ महीन्याच्या आत राज्य संघटनेकडे जमा करण्यात यावा. राज्य संघटना प्राप्त रक्कमेचे ३० टक्के निधी जिल्हा संघटने कडे वर्ग करेल.

४. **दंड आणि समपहरणे** (forfeiture):- सदस्याने कॅलेंडर वर्षातील त्या वर्षाची वार्षिक वर्गणीची मुदत संपल्यानंतर ३ महिन्यांच्या आत भरली नसेल तर तो संघटनेचा सदस्य राहु शकणार नाही. सदस्यांनी आपली थकित वर्गणी ज्या त्या आर्थिक वर्षात भरणेस बंधनकारक आहे. पण याबाबतचा अंतिम निर्णय जिल्हा कार्यकारिणी घेईल.

५. **लाभ.** संघटनेचा कोणताही सदस्य सातत्याने किमान दोन वर्ष सदस्य असल्याखेरीज आणि त्याने संपुर्ण वर्गणी दिली असल्याखेरीज, संघटनेचे कोणतेही लाभ मिळविण्याचा हक्क त्याला असणार नाही. लाभ प्राप्तीसाठी नियम ०४ नुसार सुध्दा पुर्तता होणे आवश्यक आहे.

Scanned with CamScanner

६. संघटनेच्या ज्या सदस्यांची वर्गणी थकित किंवा देय आहे, त्या सदस्याला तो अशी थकबाकी चुकती करेपर्यंत आणि अशी थकबाकी दिल्याच्या तारखेपासून दोन महिन्यांच्या कालावधी पर्यंत कोणताही लाभ मिळविण्याचा हक्क असणार नाही.

७. **सदस्यांची नोंदवही.** संघटना आपल्या सर्व सदस्यांची नावे, त्यांच्या कार्याचे व राहण्याचे ठिकाण, इत्यादी तपशीलासह सदस्यांची नोंदवही ठेवेल. तसेच ही सर्व माहिती संगणीकृत करून जतन करण्यात येईल. यासाठी जिल्हांच्या सदस्यांची नोंदवही जिल्हास्तरावर राहील व त्याचे अद्यावत ठेवण्याचे कार्य जिल्हा सचिव करतील. तसेच राज्य स्तरावरील राज्यातील संपुर्ण सदस्यांची नोंदवही अद्यावत व संगणीकृत करण्याची जवाबदारी सरचिटणीस यांची असेल.

(अ) **सभासदस्यत्व यांचे आंतरजिल्हा हस्तांतरण.** संघटनेचा एखादा सदस्य बदली झाल्याने अथवा एका जिल्हयातून इतर जिल्हयात स्थलांतरीत झाल्यास अशा सदस्यांनी त्याचे सदस्यत्व इतर जिल्हयात स्थलांतरीत करणेची विनंती केल्यास जिल्हा कार्यकारिणी यांनी स्थलांतरील करत असलेल्या जिल्हयाशी चर्चा करुन ना-हरकत प्रमाणपत्र (NOC) देवून सदस्यत्व स्थलांतर करता येईल. सदर बाबत कोणतेही शुल्क आकारण्यात येणार नाही. तसेच कोणत्याही प्रकारचे निधीचे हस्तांतरण करता येणार नाही. ना-हरकत प्रमाणपत्राची प्रत राज्य संघटनेला देवून संबधित दोनही जिल्हाने सदस्य नोंदवहीत झालेला बदलाची योग्य ती नोंद घ्यावी.

८. संघटनेचे कार्यालय ज्या वेळेस उघडे असते त्या वेळेत, रजेचे दिवस वगळता इतर कोणत्याही दिवशी कोणत्याही सदस्याला किंवा संघटनेच्या पदाधिका-याला तपासणीसाठी ही नोंदवही मुख्यालयात खुली असेल.

९. **पदाधिकारी :-**

(अ) **राज्यस्तरीय पदाधिकारी मंडळ-** संघटनेत, अध्यक्ष-०१ पद, उपाध्यक्ष-०१ पद, सरचिटणीस-०१ पद, चिटणीस-०१ पद व कोषाध्यक्ष-०१ पद असे ०५ राज्य कार्यकारिणीचे पदाधिकारी, **विभागीय उपाध्यक्ष -०६** ( प्रशासकिय विभागानुसार अमरावती, औरंगाबाद, कोकण, नागपूर, पुणे व नाशिक असे प्रत्येकी ०१ विभागीय उपाध्यक्ष), असे एकुण ११ राज्यस्तरीय पदाधिकारी यांची निवड लोकशाही पध्दतीने ०३ तिन वर्षासाठी निवडणूक नियमानुसार होईल.



Scanned with CamScanner

**विशेष उपाध्यक्ष :** सैनिक कल्याण विभाग-०१ व मंत्रालयीन कामकाजसाठी - ०१ उपाध्यक्ष व -महिला प्रतिनिधी उपाध्यक्ष-०२ असे एकुण ०४ उपाध्यक्ष यांची नियुक्ती राज्य कार्यकारिणी तर्फे करण्यात येईल. तसेच ०१ मुख्य मार्गदर्शक व ०५ सल्लागार मंडळ यांचीही नियुक्ती राज्य कार्यकारीणी करेल व सर्वसाधारण सभेकडून या १० पदांच्या नियुक्तीची मंजूरी प्राप्त करुन घेईल. असे एकुण ०५ राज्य कार्यकारीणी पदाधिकारी + ०६ विभागीय उपाध्यक्ष + ०४ नियुक्त उपाध्यक्ष + ०१ मुख्य मार्गदर्शक व ०५ सल्लागार मंडळाचे सदस्य असे **एकुण २१ पदाधिकारी असलेले राज्यस्तरीय पदाधिकारी मंडळ राहील.**

९ (अ) (०१) **विभागीय सहसचिव पदे.** राज्य कार्यकारिणी व विभागीय उपाध्यक्ष यांचे मध्ये समन्वय साधण्यासाठी तसेच विभागीय उपाध्यक्ष यांना प्रशासकिय मदत करणेसाठी व विभागीय उपाध्यक्ष यांच्या अनुपस्थितीत विभाग स्तरावर कार्य करणेसाठी ०६ विभागीय सहसचिव या पदाची निर्मीती करण्यात येत आहे. हे पद प्रशासकिय राहिल. विभागीय सहसचिव यांची नियुक्ती संबधीत प्रशासकिय विभागातूनच जिल्हा कार्यकारिणी व्दारे शिफारस केलेल्या सदस्यातून केली जाईल. शिफारस केलेल्या सदस्यांमधून जर एकापेक्षा जास्त नावाची शिफारस झाल्यास त्यांच्या पैकी एका सदस्याची सदर पदावर निवड करण्याचा अधिकार राज्यस्तरीय कार्यकारिणीस राहील.

**९ (ब) जिल्हास्तरीय संघटनात्मक रचना :-**

प्रत्येक जिल्ह्यातील कामकाज सोयीचे व्हावे या दृष्टिने राज्यस्तरीय कार्यकारी मंडळ प्रत्येक जिल्ह्यात आपल्या शाखा नेमेल, त्या जिल्ह्यांचे कामकाज पाहण्यासाठी जिल्हाध्यक्ष १ पद, उपाध्यक्ष- १ पद, सचिव- १ पद, सहसचिव- १ पद, कोषाध्यक्ष- १ पद असे ०५ जिल्हा कार्यकारिणी पदाधिकारी व ४ नियुक्त सदस्य अशी ०९ पदाधिकारी यांची रचना करण्यात येत आहे. जिल्हा कार्यकारिणी ०४ सदस्यांची नियुक्ती करेल. जिल्हा कार्यकारिणीचे ०५ पदाधिकारी यांची निवड लोकशाही पध्दतीने ३ वर्षासाठी निवडणुक उप नियमानुसार करण्यात येईल व परीस्थितीनुसार त्यांचा कार्यकाल संपल्यावर राज्यस्तरीय कार्यकारी मंडळाचे परवानगीने ६ महिन्याची मुदत वाढ देता येईल. पदाधिकारी फेर निवडणुकीसाठी पात्र राहतील. जिल्हा कार्यकारिणी आपल्या कामासाठी राज्यस्तरीय पदाधिकारी मंडळातील विभागीय उपाध्यक्ष यांचे कडुन मार्गदर्शन घेतील.

Scanned with CamScanner

९ (क) तालुकास्तरीय संघटनात्मक रचना :

प्रत्येक तालुक्यातील कामकाज सोयीचे व्हावे या दृष्टीने विभागीय उपाध्यक्ष यांच्या परवानगीने जिल्हा शाखा प्रत्येक तालुक्यात आपली शाखा नेमेल या तालुका शाखेत कामकाज पाहण्यासाठी तालुका अध्यक्ष १ पद, तालुका उपाध्यक्ष - ०१ तालुका सचिव १ पद, तालुका सहसचिव १ पद, तालुका संघटक १ पद असे ०५ तालुका कार्यकारिणी व ४ नियुक्त सदस्य अशी एकुण ०९ पदांची रचना करण्यात येईल. तालुका कार्यकारिणी ०४ सदस्यांची नियुक्ती करेल. आपल्या तालूकास्तरीय कार्यालयासाठी जिल्हाध्यक्ष यांचे कडुन मार्गदर्शन घेतील. तालुका पदाधिकारी होण्यासाठी सभासद हा संघटनेचा आजीवन सदस्य असणे आवश्यक असुन त्यांची निवड जिल्हा कार्यकारिणी विभागीय उपाध्यक्षाच्या मार्गदर्शनाखाली करेल.

१०. **संघटनेचे व्यवस्थापन :-**

संघटनेचे व्यवस्थापन, निर्देशन व नियंत्रण याबाबतचे अधिकार संघटनेच्या पुढील मंडळाकडे विहीत असतील.

(१) **सर्वसाधारण सभा** नियम क्र. १३ नुसार कार्य करेल.

(२) **राज्यस्तरीय पदाधिकारी मंडळ :-** नियम क्र. ९ (अ) अनुसार निवडण्यात आलेले २१ राज्य पदाधिकारी.

(३) **राज्यस्तरीय कार्यकारी मंडळ.** राज्यस्तरीय कार्यकारी मंडळ पदाधिकारी अधिक व्यापक असून त्याची रचना खालील प्रमाणे राहील. त्यात खालील घटकांचा समावेश राहील.

(अ) राज्यस्तरीय पदाधिकारी मंडळाचे सर्व सभासद कार्यकारी मंडळाचे सभासद राहतील.

(ब) प्रत्येक जिल्हा संघटनेचे जिल्हाध्यक्ष व सचिव कार्यकारी मंडळाचे सभासद राहतील.

Scanned with CamScanner

११. **रिक्त पदे भरणे आणि पदावरून काढून टाकणे**. जिल्हा कार्यकारी मंडळाच्या पदाधिका-यांमध्ये किंवा राज्य पदाधिकारी मंडळामध्ये रिक्त पद निर्माण झाल्यास ते पद राज्य कार्यकारिणी एखाद्या सदस्यास नियुक्त करून भरेल. तसेच एखादी जिल्हास्तरीय कार्यकारिणी संघटनेच्या हीताचे किंवा संघटनेच्या प्रगतीचे कार्य करत नसेल तर त्या कार्यकारिणीला बरखास्त करून पुन्हा निवडणूक घेण्याचे अधिकार राज्यस्तरीय कार्यकारी मंडळाला राहील.

(अ) राज्य /जिल्हा कार्यकारिणीतील एखादे पद कोणत्याही कारणास्तव रिक्त झाले असल्यास किंवा एखादया प्रसंगानुसार/परिस्थितीनुसार नविन पद निर्माण करण्याची आवश्यकता भासल्यास तसेच त्या पदाकरीता योग्य नेतृत्व करणारा पदाधिकारी न मिळाल्यास त्या पदाचा अतिरीक्त पदभार हा कोणत्याही पदाधिका-याकडे कमाल सहा महिण्याकरीता देण्यात येईल. तसेच अशा पदाची तात्पुरती नियुक्ती करण्याचा अधिकार हा राज्य कार्यकारिणीस राहील.

**(ब)** संघटना बळकटीसाठी व सर्वांना संधी प्राप्त होणेसाठी एक व्यक्ती एक पद हे धोरण राबविण्यात येईल.

१२. **गैरवर्तणूक**. संघटना नियम, SOPs, व ठरविलेले नियमांचे पालन न करणे, आर्थिक नुकसान करणे, भ्रष्टाचार करणे, राज्य/केन्द्र शासनाचे नियमांचे उल्लंघन करणे, असंवैधानिक कार्य करणे तसेच लबाडी करणा-या किंवा संघटनेच्या हिताला बाधक ठरेल अशी कृती करणा-या कोणत्याही पदाधिका-याला राज्य पदाधिकारी मंडळ हे बहूमताने काढून टाकेल, त्यांचे सदस्यत्व रद्द करेल व गरज भासल्यास कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल. तसेच केलेली कार्यवाही ही वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये तीन चतुर्थांश सदस्यांच्या मतदाधिक्याने मंजूर करुन घेण्यात येईल. अशा सदस्यांचे सदस्यत्व शुल्क परत केले जाणार नाही.

१३. **संघटनेच्या सभा** - सरचिटणीस अध्यक्षांशी विचार विनिमय करून निश्चित करतील अशा खालील सभा घेण्यात येतील :-

(अ) **वार्षिक सर्वसाधारण सभा**. वार्षिक सर्वसाधारण सभा ही वर्षातून एकदा घेण्यात येईल. या सभेस राज्यस्तरीय पदाधिकारी मंडळाचे २१ सदस्य, ०६ विभागीय उपाध्यक्ष, ०५ सहसचिव व ०५ जिल्हा कार्यकारिणी पदाधिकारी उपस्थित राहतील.

Scanned with CamScanner

(ब) **संघटनेचे राज्यस्तरीय अधिवेशन**. संघटनेचे राज्यस्तरीय अधिवेशन हे ०३ (तीन) वर्षातून एकदा होईल. या अधिवेशनास खालील उपस्थिती राहील.

(१) राज्य पदाधिकारी मंडळाचे सर्व सदस्य.
(२) राज्य कार्यकारी मंडळाचे सर्व सदस्य.
(३) सर्व आजीवन सदस्य व नियमित सर्वसाधारण सदस्य.

**नियम १३ अन्वये आयोजित करण्यात येणा-या सभेत पुढील कामकाज करण्यात येतील.**

अ) संघटनेने केलेल्या कामाचा वार्षिक अहवाल व लेख्यांचे लेखा परीक्षकांनी तपासलेले विवरणपत्र स्विकृत करणे.
आ) संघटनेची येणा-या वर्षाची कार्यपध्दती ठरविणे.
इ) अध्यक्षांच्या परवानगीने सभेसमोर ठेवण्यात येणारे इतर कामकाज करणे, वेळेवर उपस्थितीत होणा-या विषयावर चर्चा करणे व निर्णय घेणे.
ई) जिल्हा कार्यकारिणीचा वार्षिक अहवाल व केलेले कार्य यांचा अहवाल जिल्हा कार्यकारिणीने सादर करणे.

१४. **गणपूर्ती**. संघटनेच्या सर्व सभांसाठी किमान एक तृतीयांश सदस्यांची उपस्थिती आवश्यक असेल. गणपुर्ती पुर्ण होत नसेल तर सभा अर्धा तास प्रलंबित ठेवून परत एकदा आयोजित करण्यात यावी. या वेळेस घेतलेल्या सभेसाठी गणपुर्तीची आवश्यकता राहणार नाही.

१५. नियम १३ (अ) व १३ (ब) अनुसार सभेच्या आयोजनासाठी किमान १५ दिवसाची नोटीस द्यावी लागेल.

१६. **विशेष सभा**. अध्यक्ष यांना आवश्यक वाटेल तेव्हा संघटनेच्या सदस्यांची सर्वसाधारण विशेष सभा बोलवु शकतील. तसेच संघटनेच्या एकूण सदस्य संख्येच्या एक तृतीयांश सदस्यांनी मागणी केल्यानंतर विशेष सभा आयोजित करण्यात यावी. अशी मागणी आल्यास २० दिवसाच्या आत सभा बोलवावी लागेल. जर अध्यक्षांने किंवा सरचिटणीसाने अशी सर्वसाधारण विशेष सभा बोलविण्यात कसूर केली तर सभेची मागणी करणारे सदस्य स्वतःहुन अशी सभा एक महिन्याची नोटीस पदाधिकारी मंडळास दिल्यानंतर बोलावतील आणि त्या सभेतील कामकाज संघटनेवर बंधनकारक राहील.

Scanned with CamScanner

१७. राज्यस्तरीय पदाधिका-यांची कर्तव्ये :-

(अ) **अध्यक्ष** - अध्यक्ष संघटनेच्या कार्यकारी मंडळाच्या व पदाधिकारी मंडळाच्या सर्व सभाचे अध्यक्षपदी असतील. त्या सभांमध्ये सुव्यवस्था ठेवतील, सर्व कार्यवृत्तांवर सह्या करतील आणि त्यांना फक्त निर्णायक मत देण्याची परवानगी असेल. आवश्यक असेल तेव्हा कार्यकारी मंडळ किंवा संघटनेची विशेष सभा बोलवण्याचे अधिकार अध्यक्षांना असतील. अध्यक्षांच्या अनुपस्थित उपाध्यक्ष, सरचिटणिस, चिटणिस, कोषाध्यक्ष हे अनुक्रमे उपस्थिती प्रमाणे अध्यक्ष स्थान भूषवतील. सर्व पदाधिकारी यांची विस्तृत कर्तव्यासाठी अध्यक्ष हे वेळोवेळी SOPs बनवू शकतील. जेणेकरुन त्यानुसार कार्यपध्दती/पदाधिकारी यांना कार्य करणे सोयीस्कर होईल.

(ब) **उपाध्यक्ष**. अध्यक्षांच्या अनुपस्थित अध्यक्षांचे सर्व कार्य पार पाडतील.

(क) **सरचिटणीस**. सरचिटणीस संघटनेच्या व समित्यांच्या सर्व सभेंचे इतिवृत्त लिहितील व सर्व कार्यालयीन कामकाज सांभाळतील. सर्व सभा बोलावतील, अध्यक्षांशी विचार विनिमय करून वेळोवेळी येणारे कामे पार पाडतील.

(ड) **चिटणीस**. चिटणीस हे सरचिटणीसांना सर्व कामात सर्वसाधारणपणे मदत करतील. सरचिटणीसांच्या अनुपस्थितीत चिटणीस त्यांचे सर्व कार्यभार सांभाळतील.

(इ) **कोषाध्यक्ष**. कोषाध्यक्ष हे सर्व जमा खर्चाचा अचुक हिशोब ठेवतील, ते दरवर्षी जमा खर्चाची प्रत्येक बाब स्पष्ट दर्शविणारा ताळेबंद तयार करतील. संघटनेमध्ये वेळोवेळी भरणा केलेल्या रकमाकरीता आणि त्या योग्यरितीने ठेवण्याकरीता जबाबदार राहतील. ते पदाधिकारी मंडळाने मंजुर केलेल्या सर्व खर्चासाठी रकमा प्रदान करतील. वित्तीय SOP अनुसार कोषाध्यक्ष कार्य करतील.

(ई) **विभागीय उपाध्यक्ष**. अध्यक्ष व उपाध्यक्ष यांना वेळोवेळी सर्वसाधारण कामात मदत करून आपल्या विभागाचे प्रतिनिधीत्व पदाधिकारी मंडळावर करतील व अधिनस्थ जिल्हातील कार्यकारिणीचे कामावर लक्ष ठेवून संघटनाच्या बळकटीचे कार्य करतील. जिल्हा कार्यकारिणीची निवड/निवडणूक व बैठका आपल्या उपस्थितीत पार पाडतील.

Scanned with CamScanner

(फ) **सल्लागार**. संघटनेचे कामकाजासाठी कायद्यानुसार सल्ला देणे व संघटने कामकाज घटनेनुसार होण्यासाठी अध्यक्ष/सरचिटणीस व पदाधिकारी मंडळा मार्गदर्शन करणे.

(ग) **विभागीय सहसचिव**. विभागीय सहसचिव हे विभागीय उपाध्यक्ष यांना सर्व कामात मदत करतील. तसेच राज्य कार्यकारिणीव्दारे प्रशासकीय कामांसाठी त्यांची निवड झालेली असल्याने राज्य कार्यकारिणीच्या दिशानिर्देशानुसार कार्य करतील. विभागीय उपाध्यक्ष यांच्या अनुपस्थितीत ते विभागाचे कार्य सांभाळतील.

१८. **सर्वसाधारण निधी**. सर्वसाधारण निधी मध्ये सदस्यांनी दिलेल्या वर्गणी, देणग्या ईत्यादीचा समावेश असेल. ती रक्कम पदाधिकारी मंडळ मान्य करेल अशा बँकेत किंवा बँका मध्ये संघटनेच्या नावाने ठेवण्यात येईल. संबधीत खात्याचा व्यवहार अध्यक्ष, सरचिटणीस आणि कोषाध्यक्ष किंवा त्यांनी मनोनित केलेल्या सदस्यांपैकी दोघांच्या स्वाक्षरीने कार्य सांभाळले जाईल. किंवा कोषाध्यक्ष दैनंदिन खर्चासाठी त्यांच्या जवळ रूपये २५,०००/- पेक्षा अधिक रक्कम ठेवु शकणार नाही.

जिल्हा कार्यकारिणीने सामान्य लेखन सामग्री, त्रैमासीक बैठक, संघटना वाढीसाठी केलेल्या प्रवासाचे भत्ते व आकस्मीत खर्चासाठी वार्षिक रू.१००००/- पर्यंत खर्च करण्यात यावा. तथापी, या रक्कमेच्या वर खर्च होणे अपेक्षित असल्यास त्यासाठी राज्य कार्यकारिणी कडुन पूर्व परवानगी घेणे आवश्यक राहील.

१९ (अ). संघटनेच्या कोषाचे योग्यप्रकारे विनियोजन राहण्यासाठी निधी संबधी स्वतंत्र नियमावली Standing Operating Procedure (SOP) तयार करण्यात यावी, जेणे करुन राज्य कोषाध्यक्ष/जिल्हा कोषाध्यक्ष यांना कोष संबधी व्यवहार करणे सुरळीत होईल. गरज भासल्यास वित्तीय समितीचे गठण करण्यात येवून राज्य स्तरावरील व जिल्हा स्तरावरील कोषासंबधी आढावा घेणे/नियोजन करणे सोयीस्कर होईल.

१९ (ब). राज्य संघटनाचा कोषाचे बँक खाते हे राष्ट्रीयकृत बँकेत (महाराष्ट्र बँक) आहे. करीता जिल्हा बँकेचे खाते सुध्दा राष्ट्रीयकृत बँकेत (महाराष्ट्र बँक) उघडण्यात यावे. जिल्हा स्तरावर बँक खाते उघडण्यापुर्वी राज्य स्तरावरुन बँकेचे नावे ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त करुन घेणे आवश्यक राहील. तथापी घटनात्मक जिल्हा कार्यकारिणीचे कोरम पुर्ण झाल्याशिवाय जिल्हा स्तरावर बँक खाते उघडण्याची परवाणगी देण्यात

Scanned with CamScanner

येणार नाही. संघटनेचे बँक खाते उघडताना जिल्हा अध्यक्ष, सचिव/कोषाध्यक्ष स्वाक्षरीने ना-हरकत प्रमाणपत्रात नमूद नावाने खाते उघडण्यात यावे. ज्या पदाधिकारी यांना राज्य संघटनेचे व जिल्हा स्तरावरील खाते ऑपरेटींग करण्याची अनुमती संघटनेनी प्रदान केली आहे, अशा सदस्यांची अनुमती रद्द करण्याची व त्यांच्या जागी नवीन पदाधिकारी यांची नियुक्ती करण्याचा अधिकार राज्य कार्यकारिणीस राहील.

**२०. ज्या कामाकरीता सर्वसाधारण निधीतुन खर्च करण्यात येईल ती उद्दीष्टे :-**

संघटनेचा सर्वसाधारण निधी पुढील उद्दिष्टाव्यतिरिक्त खर्च करता कामा नये, ती उद्दिष्टे अशी :-

अ) संघटनेच्या पदाधिका-यांचे मानधन, भत्ते व खर्च देणे, निवडणूक प्रक्रियेचा खर्च भागविणे, बैठकीस निधी उपलब्ध करून देणे, सर्वसाधारण सभेचे व अधिवेशनाचा खर्च भागविणे.

ब) लेखा परिक्षणास येणारा खर्च पुर्ण करणे.

क) ज्या कोणत्याही विधी कार्यवाहीत संघटना पक्षकार असेल अशा कार्यवाहीमध्ये खटला किंवा बचाव संघटनेच्या दृष्टीने हितकारक असेल अशा खटल्यांचा खर्च भागविणे.

ड) संघटनेच्या विवादातून होणा-या नुकसानी बद्दल सदस्यांना नुकसान भरपाई देणे.

इ) संघटनेच्या सदस्याचा मृत्यु, वृध्दत्व, आजार, अपघात या करीता सदस्यांना किंवा त्यांच्या अवलंबितांना शासकीय कार्यालय / सैनिक कल्याण कार्यालयाअंतर्गत सर्व लाभ मिळविण्याकरीता सर्व जिल्हा कार्यकारिणी मदत करेल.

फ) विभागीय उपाध्यक्ष/विभागीय सहसचिव यांचे व्दारे केलेला खर्चाची देयके राज्य कोषामधून अदा केली जातील.

ग) सदस्याकरीता किंवा त्यांच्या अवलंबित व्यक्तीकरिता शैक्षणिक/सामाजिक लाभांची तरतुद करणे.

Scanned with CamScanner

ह) शासकीय कर्मचा-यांना बाधक ठरणा-या प्रश्नांवर विचार-विनिमय करण्याच्या प्रयोजनासाठी प्रामुख्याने शासनाच्या पूर्व मान्यतेने व्यवस्था चालविणे व संघटनेच्या निधीचा योग्य प्रकारे वाढ करण्यासाठी तसेच त्या निधीची गुंतवणूक करण्याचा अधिकार राज्यस्तरीय पदाधिकारी मंडळास राहील.

ज) संघटनेचा सर्वसाधारण निधी ज्या उद्दिष्टांकरिता खर्च करण्यात येणार असेल त्या उद्दिष्टां पैकी कोणत्याही उद्दिष्टांच्या अभिवृध्दी करीता रक्कम प्रदान करणे, त्यासाठी राज्य पदाधिकारी मंडळाने वेळोवेळी दिलेल्या परिपत्रकानुसार व्यवहार करणे.

झ) अधिसुचनेमध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या कोणत्याही शर्तीच्या अधीन राहून योग्य त्या सरकारने शासकीय राजपत्रात अधिसूचित केलेले इतर कोणतेही उद्दिष्टे.

२१. **वार्षिक लेखापरीक्षण.** संघटनेच्या लेख्यांचे वार्षिक लेखा परिक्षण सक्षम लेखा परिक्षकाकडून करून घेण्याकरीता योग्य तरतुद करेल, मुंबई श्रमिक संघ विनिमय. १९२७ यांच्या नियम १८ अनुसार पदाधिकारी मंडळ त्या लेखापरिक्षकाची नेमणूक करील.

सर्व जिल्हा कार्यकारीणीने आर्थिक वर्षात दिनांक ०१ एप्रिल ते ३१ मार्च पर्यंत केलेल्या जमा व खर्चाचे विवरण आर्थिक वर्ष संपल्यावर दिनांक ३० एप्रिल पर्यंत राज्य कोषाध्यक्ष यांचेकडे सादर करावे. जेणे करुन संघटनेचा जमा-खर्च अहवाल नियमानुसार विहीत कालावधीमध्ये लेखा परिक्षकाकडून करुन घेता येईल.

२२. **लेखा पुस्तकांची तपासणी.** संघटनेच्या मुख्यालयातील कोणत्याही अधिका-याला किंवा संघटनेच्या सदस्याला साप्ताहीक सुट्टी व शासकीक अवकाशाचे दिवस सोडून इतर सर्व कार्यालयीन वेळेमध्ये संघटनेच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेमध्ये संघटनेच्या लेखा पुस्तकांची तपासणी करता येईल.

२३. **संघटना प्रकाशने व कल्याणकारी समिती.** संघटनेच्या सदस्यांच्या हितार्थ संघटना कल्याणकारी व प्रकाशने समितीचे गठण करता येईल. या समितीचे अध्यक्ष व प्रकाशनाचे मुख्यसंपादक हे संघटनेचे पदसिद्व अध्यक्ष राहतील. यासाठी वेगळा कोषाचे प्रावधान करण्यात यावे व वेगळे बँक खाते उघडण्यात यावे. संघटनेच्या कोषातून कल्याणकारी समिती व प्रकाशनेसाठी निधीची उपलब्धता करुन देण्यात यावी. या समितीव्दारे संघटनेचे विविध प्रकाशने जसे कर्मयोद्वे वार्षिक विशेषांक, दिनदर्शिका, संघटना डायरी इत्यादी प्रकाशित करण्यात यावी.

Scanned with CamScanner

तसेच या समितीव्दारे प्रकाशने वितरण करणे, संघटनेसाठीची स्टेशनरी, प्रिंटींग व इतर आवश्यक साहित्य खरेदी करण्यात यावीत. तसेच संघटना सदस्यांसाठी विविध कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी निधी उपलब्धतेनुसार याच समितीव्दारे करण्यात यावी. सदर समितीचे गठण राज्यस्तरीय पदाधिकारी मंडळाव्दारे करण्यात येईल व या समितीचा कालावधी दरवर्षी ०१ एप्रिल ते ३१ मार्च या वित्तीय वर्षापुरता मर्यादीत राहील. कालावधी संपुष्टात आल्यानंतर सदर समितीकडे असलेल्या लेख्याचे/जवाबदारीचे/कार्याचे हस्तांतरण नवीन समितीकडे करणे बंधन कारक राहील. समितीचे कार्य समाधानकारक असल्यास पुढील एक वर्ष नवीन कालावधी वाढविण्याचा अधिकार राज्यस्तरीय पदाधिकारी मंडळास राहील.

२४. **संघटनेचे लेटर पॅड.** संघटना ही शासन मान्य संघटना असल्यामुळे संघटनेच्या लेटरपॅडचे महत्व अनन्य साधारण आहे. लेटरपॅडचा योग्य वापर होणे करीता व दुरुपयोग टाळण्यासाठी राज्य संघटना व जिल्हा संघटना यांचे लेटर पॅड मध्ये सुसूत्रता असणे आवश्यक आहे. लेटर पॅड कसे असावे, लेटर पॅडवर पदाधिकारी यांचे नावे कसे असावे, लेटर पॅडचा वापर कुणी व कशासाठी, कोणत्या स्तरावर कसा करावा, अशा विविध कारणासाठी एक नियमावली SOP तयार करण्यात यावी. SOP मध्ये सुचित केल्याप्रमाणे लेटरपॅडची प्रिंटींग करुन नमूद नियमाप्रमाणे लेटरपॅडचा वापर करण्यात यावा.

२५. **चर्चेसाठी प्रतिनिधीची निवड** - शासनाने संघटने सोबत संघटनेच्या मागण्याकरीता किंवा इतर कारणांसाठी चर्चेसाठी आमंत्रित केल्यास व शासनाने संघटनेच्या पदाधिका-यांची संख्या येताना जर निश्चित असा आकडा देवून कळविल्यास, सोबत कोणते पदाधिकारी/सदस्य यांना नियुक्त करावयाचे हे ठरविण्याचा अधिकार राज्य अध्यक्षांना राहील.

Scanned with CamScanner

२६. **नियमांमध्ये दुरूस्ती करणे**. शासनाच्या मान्यतेच्या अधीन राहून सर्वसाधारण सभेमध्ये सदस्यांच्या बहुमताने कोणत्याही वेळी नियमामध्ये दुरूस्ती करता येईल, बदल करता येईल, पूर्वीच्या नियमा ऐवजी दुसरे नियम करता येतील किंवा त्यामध्ये भर घालता येईल. परंतु प्रस्तावित बदलाबाबत सदस्यांना ७ दिवस अगोदर सुचना देण्यात आली पाहिजे.

२७. **संघटना विसर्जित करणे**. संघटना विसर्जित करण्याकरिता बोलावण्यात आलेल्या सर्वसाधारण सभेला उपस्थित असलेल्या सदस्यापैकी तीन चतुर्थांश सदस्यांच्या बहुमताशिवाय संघटना विसर्जित करता येणार नाही. संघटनेजवळ असलेला निधी संघटनेच्या सभेनंतर सर्व देणे पुर्ण करून उरलेला निधी सर्वसाधारण सभेच्या परवानगीने विनियोग/खर्च केला जाईल.

**समाप्त**

Scanned with CamScanner

# शासकिय पुनर्नियुक्त माजी सैनिक संघटना, महाराष्ट्र राज्य

## निवडणुक उपनियम

१. **नाव** :- या नियमांना "शासकिय पुनर्नियुक्त माजी सैनिक संघटना", महाराष्ट्र राज्य या संघटनेचे पदाधिकारी व कार्यकारिणी सदस्य यांच्या निवडणुकीचे नियम असे संबोधण्यात येईल.

२. **व्याख्या** :- या नियमामध्ये संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल.

(अ) संघटना म्हणजे शासकिय पुनर्नियुक्त माजी सैनिक संघटना, महाराष्ट्र राज्य असे आहे/राहील.

(ब) घटना म्हणजे "शासकिय पुनर्नियुक्त माजी सैनिक संघटना, महाराष्ट्र राज्य या संघटनेची घटना असे संबोधण्यात येईल.

(क) निवडणुक अधिकारी म्हणजे या नियमानुसार राज्य कार्यकारिणीने नाम निर्देशित केलेली व्यक्ती आहे व या सज्ञेत सहाय्यक निवडणुक अधिकारी" यांचाही अंतरभाव आहे.

३. **पदाधिकारी व कार्यकारिणी सदस्यांची निवडणुक**

**(१) जिल्हा कार्यकारिणी :-** घटनेच्या नियम ९ (ब) मध्ये नमुद केलेले पदाधिकारी व कार्यकारिणी सदस्य घटनेच्या नियम क्र. ३ (अ) व (ब) च्या तरतुदीनुसार सदस्य असलेल्या त्या जिल्हयातील आजीवन सदस्य कडुन निवडण्यात येईल.

**(२) राज्य कार्यकारिणी :-** घटनेच्या नियम ९ (अ) मध्ये नमुद केलेले राज्यस्तरीय पदाधिकारी घटनेच्या नियम क्र. ९ (ब) मधील तरतुदी नुसार निवडण्यात आलेल्या जिल्हा कार्यकारिणीतील पाच पदाधिकारी द्वारा निवडण्यात येतील.

४. **पदाधिकारी व कार्यकारिणी सदस्य म्हणुन निवड होण्यासाठीची अर्हता :-**

**(१) जिल्हा कार्यकारिणी :-** संघटनेच्या सदस्यत्व नियम ३ (ब) मधील अटी व शर्ती पुर्ण करणारा सभासद / पदाधिकारी जिल्हा कार्यकारिणी सदस्य म्हणुन निवडला जाण्यास अर्हता पात्र राहील. अशा सदस्यांनी त्यांचे नामनिर्देशन पत्र निवडणुक अधिका-यास सादर करण्यापुर्वी संघटनेची ०२ (दोन) वर्षे सतत सभासद वर्गणी भरली असली पाहिजे. तसेच आजीवन सदस्यत्वाची वर्गणी **रु.१०,०००/-** राज्य संघटनेकडे जिल्हयाव्दारे जमा केलेली असावी. तसेच बिनपरतावा उमेदवारी अनामत रक्कम **रु.१,०००/-** जमा करणे आवश्यक राहील. या सबंधीत राज्य कार्यकारिणीने मंजूर केलेल्या अतिरीक्त अर्हतेची / अटींची पुर्तता केली असली पाहिजे.

Scanned with CamScanner

(२) **राज्य कार्यकार्यकारिणी** :- राज्य संघटनेशी संलग्न असलेल्या जिल्हा कार्यकारिणी कार्यरत असलेला पदाधिकारी किंवा अनुभवी सदस्य राज्य संघटनेचा पदाधिकारी किंवा विभागी उपाध्यक्ष निवडला जाण्यास निवडणुकीला अर्हता पात्र राहील. मात्र त्या जिल्हा शाखाने राज्य संघटनेची वर्गणी नियमित भरलेली असावी. तसेच राज्य संघटनेच्या अतिरीक्त अर्हतेची/ अटींची पुर्तता केली असली पाहीजे. त्याने जिल्हा कार्यकारिणी उमेदवारी अनामत रक्कम **रू. २,०००/-** जिल्हा कार्यकारिणीकडे जमा करणे आवश्यक राहील. तसेच जिल्हाध्यक्ष यांचे सहमती पत्र (NOC) अत्यंत आवश्यक असेल.

(३) राज्य कार्यकारिणी सदस्य होणेसाठी सदस्य हा इतर कोणत्याही संघटनेचा पदाधिकारी असू नये.

(४) राज्य कार्यकारिणी स्तरावरील घटनात्मक पदाकरिता नामांकन अर्ज दाखल करणार सभासद हा किमान तीन वर्षे कालावधी इतका संघटनेचा आजीवन सदस्य असावा.

(५) जिल्हा कार्यकारिणी सदस्य होणेसाठी सदस्य हा इतर माजी सैनिक संघटना पदाधिकारी असू नये. परंतू पुर्ननियुक्त माजी सैनिक त्यांच्या कार्यरत असलेल्या (संवर्ग) कर्मचारी संघटना मधील (शासकिय/निमशासकिय) पदाधिकारी असल्यास जिल्हा कार्यकारिणी सदस्य होणेस पात्र आहे.

(६) जिल्हा स्तरावरील घटनात्मक पदाकरिता नामांकन अर्ज दाखल करणारा सभासद हा किमान ०२ (दोन) वर्षे कालावधी इतका संघटनेचा आजीवन सदस्य असावा. नविन स्थापित जिल्हा कार्यकारिणीस ही अट लागू राहणार नाही.

५. **निवडणुक अधिकारी :-** कार्यकारी मंडळाचा सभासद नसलेला महाराष्ट्र शासनाच्या आजी अथवा माजी कर्मचा-यास कार्यकारी मंडळ निवडणुक अधिकारी म्हणुन नामनिर्देशित करतील.

(१) निवडणुक अधिकारी कार्यकारिणीने मंजुर केलेली सर्वसाधारण सभेच्या सदस्यांची यादी मतदार यादी म्हणुन प्रसिध्द करील.

(२) या नियमात विहीत न केलेल्या बाबी सबंधात सर्वसाधारण नियमाची सुसंगत निर्णय घेईल.

(३) राज्य कार्यकारिणी मंडळाच्या अधिन राहून सहाय्यक निवडणुक अधिकारी तसेच मतदानास व मत मोजणीस आवश्यक असलेल्या कर्मचा-यांची नेमणुक निवडणूक अधिकारी निर्णय करेल.

Scanned with CamScanner

६. मतदार :-

(१) **जिल्हा कार्यकारिणी** :- संघटनेच्या कलम ३ (अ) व (३) (ब) अन्वये सदस्य असलेला सर्वसाधारण सभेचा सभासद मतदान करण्यास पात्र असेल, आणि त्याला पदाधिका-याच्या पदाच्या प्रत्येक पदासाठी प्रत्येकी एक मत एकदाच देण्याच्या अधिकार असेल.

(२) **राज्य कार्यकारिणी** :- घटनेच्या कलम ९ (ब) अन्वये निवडण्यात आलेल्या जिल्हा कार्यकारिणीच्या पदाधिकारी हे राज्यस्तरीय पदाधिकारी मंडळासाठी मतदान करण्यास पात्र राहील. परंतू सदर जिल्हयाचे कोरम म्हणजे ०५ पदे पुर्ण भरलेली असावी. ज्या जिल्हयाच्या कार्यकारिणीतील पुर्ण पदे भरलेले नसतील तर तो जिल्हा मात्र मतदान करण्यास पात्र राहणार नाही.

७. **मतदार याद्या.** राज्य कार्यकारिणीने मान्यता दिलेल्या मतदारांच्या अंतिम यादीची प्रत संघटनेच्या प्रसिद्वी माध्यमांवर प्रसारीत करण्यात येईल. **जसे-** संघटनेची वेबसाईट, व्हॉटसअॅपवर ग्रुप व ई-मेल इत्यादीवर प्रसिद्वी करण्यात येईल.

८. **पदाधिका-यांच्या व कार्यकारिणीच्या सदस्यांची निवडणुक:-** अधिसुचनेनुसार निवडणुक अधिकारी निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर करील.

(१) नामनिर्देशन अर्ज सादर करण्याची अखेरची तारीख ही निवडणुकीची अधिसुचना प्रसिध्द झाल्याचे तारेखापासुन १० दिवसांपेक्षा कमी नसावी.

(२) नामनिर्देशन अर्जाच्या छाननीची व वैध नामनिर्देशन अर्जाची यादी प्रसिध्द करणेची तारीख नामनिर्देशन अर्ज सादर करण्यासाठीची जी अखेरची तारीख असेल तिच्या लगत नंतरच्या दिवसापेक्षा अगोदरची नसेल.

(३) उमेदवारी मागे घेण्याची अखेरची तारीख, नामनिर्देशन अर्जाच्या छाननीच्या दिनांकापासुन ०७ (सात) दिवसापेक्षा कमी नसेल.

(४) निवडणुक लढविणा-या उमेदवारांची अंतिम यादी प्रसिध्द करण्याची तारीख उमेदवारी मागे घेण्याच्या अखेरच्या तारखेच्या लगत नंतरचा दिवस किंवा त्याच दिवशी असेल.

(५) मतदान ज्या तारखेत घेण्यात येईल, ती तारीख निवडणुक लढणा-या उमेदवारांची अंतिम यादी प्रसिध्द झालेल्या तारखेपासुन ०८ आठ दिवसापुर्वीची नसेल.

Scanned with CamScanner

(६) निवडणुक निर्णय अधिकारी, तारखेचा निर्देश करून निवडणुकीची नोटीस काढेल व तो संघटनेच्या प्रसिद्धी माध्यमांवर प्रसारीत करण्यात येईल. जसे- संघटनेची वेबसाईट, व्हॉटसअॅपवर ग्रुप व ई-मेल इत्यादीवर प्रसिद्धी करण्यात येईल.

**९) निवडणूकीसाठी उमेदवारांचे नामनिर्देशन :-**

(१) विहीत नमुन्यातील उमेदवारी अर्जावर राज्य पदाधिकारी मंडळासाठी किमान एक सुचक व दोन अनुमोदक व विभागीय उपाध्यक्षासाठी किमान एक सुचक व एक अनुमोदकाने नामनिर्देशन अर्ज महाराष्ट्रातील कुठल्याही एका जिल्हा शाखेच्या अध्यक्ष किंवा सचिव यांचे सहीने जिल्हा शाखेच्या ठरावाने स्वाक्षरीत केले पाहिजेत.

(२) नामनिर्देशन अर्ज स्वतः उमेदवाराने अथवा सुचकाने सादर केले पाहिजे.

(३) मतदार यादीत समावेश असलेल्या आमसभा सदस्यांना जिल्हा कार्यकारिणीसाठी सुचक किंवा अनुमोदक म्हणुन उमेदवारी नामनिर्देशित करता येईल.

(४) राज्य पदाधिकारी मंडळासाठी राज्य संघटनेशी संलग्न असलेल्या जिल्हा शाखेतील पदाधिकारी, सुचक, अनुमोदक व मतदार असु शकेल.

(५) सुचक व अनुमोदकाकडे संघटनेची सभासद वर्गणी थकीत नसावी तसेच कार्यकारिणी मंडळाने मंजूर केलेल्या अटी/अर्हताची त्याने पुर्तता केली असली पाहिजे.

**१०. नामनिर्देशन अर्जाची छाननी :-** नामनिर्देशन अर्जाची छाननी करण्यासाठी निश्चित केलेल्या तारखेस निवडणुक अधिकारी उमेदवारांना व सुचकांना किंवा त्यांनी यथोचितरित्या प्राधिकृत केलेल्या इतर व्यक्तिंना छाननीच्या ठिकाणी उपस्थित राहण्याची परवानगी देवू शकेल आणि नियमात घालुन दिलेल्या मुदतीत व योग्य त्या पध्दतीने देण्यात आलेली सर्व उमेदवारांचे नामनिर्देशन अर्ज तपासण्याबाबतच्या सर्व वाजवी सोयी त्यांना देईल, तो त्यानंतर नामनिर्देशन अर्जाची तपासणी करेल व कोणत्याही नामनिर्देशन अर्जाच्या बाबतीत आलेल्या सर्व आक्षेपावर निर्णय देईल व पुढील पैकी कोणत्याही कारणास्तव कोणतेही नामनिर्देशन अर्ज फेटाळून लावू शकेल.

(अ) तो उमेदवार पदाधिकारी किंवा कार्यकारिणी सदस्य म्हणुन निवडला जाण्यात अर्हता पात्र नसेल.

(ब) त्यावरील सुचक / अनुमोदक सही करण्यात अर्हता पात्र नसेल.

Scanned with CamScanner

(क) नामनिर्देशन अर्जावरील उमेदवाराच्या / सुचकाच्या / अनुमोदकाच्या सह्या ख-या असतील. कोणतेही नामनिर्देशन अर्ज हे दोषरहित व परिपुर्ण असावे. नामनिर्देशन अर्ज स्विकारणा-या किंवा ते फेटाळण्याचा निर्णय नमुद केल्यावर निवडणूक निर्णय अधिकारी वैध नामनिर्देशित उमेदवारांची यादी तयार करील व ती संघटनेच्या प्रसिद्वी माध्यमांवर प्रसारीत करण्यात येईल. जसे- संघटनेची वेबसाईट, व्हॉटसॲपवर ग्रुप व ई-मेल इत्यादीवर प्रसिद्वी करण्यात येईल.

**११. नामनिर्देशन अर्ज (उमेदवारी अर्ज) मागे घेणे :-**

(अ) कोणताही उमेदवार आपला उमेदवारी अर्ज मागे घेणे करीता विहीत नमुन्यात निवडणुक अधिका-यास स्वत: किंवा यथोचितरीत्या प्राधिकृत केलेल्या व्यक्ति मार्फत विहीत कालावधीपुर्वी अर्ज देवून आपली उमेदवारी मागे घेवु शकेल.

(ब) वरील पोट नियम (अ) नुसार उमेदवारी मागे घेण्याचा अर्ज दिलेल्या कोणत्याही उमेदवाराला सादर केलेला तो अर्ज रद्द करण्याची परवानगी देण्यात येणार नाही.

**१२. निवडणुक लढणा-या उमेदवाराची यादी प्रसिध्द करणे :-** उमेदवारी अर्ज मागे घेण्यासाठी निश्चित केलेली मुदत संपल्यानंतर निवडणुक निर्णय अधिकारी निवडणुक लढणा-या उमेदवारांची पदनिहाय यादी तयार करील, त्याची प्रत संघटनेच्या संघटनेच्या प्रसिद्वी माध्यमांवर प्रसारीत करण्यात येईल. जसे- संघटनेची वेबसाईट, व्हॉटसॲपवर ग्रुप व ई-मेल इत्यादीवर प्रसिद्वी करण्यात येईल.

**१३. बिनविरोध निवडणुक :-** उमेदवारी अर्ज मागे घेण्यासाठी निश्चित केलेली मुदत संपल्यानंतर ज्या पदासाठी फक्त एकच उमेदवार असेल/नामनिर्देशन अर्ज शिल्लक राहील, असे सर्व उमेदवारांची यादी त्या-त्या पदावर उक्त पद भरण्यासाठी यथोचितरित्या बिनविरोध निवडुन आलेले उमेदवार म्हणुन निवडणुक अधिकारी घोषित करेल.

**१४. मतदान व निवडणुकीच्या वेळेची मतदान पध्दती :-**

(अ) मतदान जेव्हा आवश्यक असेल तेव्हा निवडणुक अधिकारी मतदान घेण्यासाठी उपाययोजना करील.

(ब) ज्या वेळेस मतदान घेण्यात येईल अशा प्रत्येक निवडणुकीच्या वेळी मतदान हे गुप्त मतदान पध्दतीने करण्यात येईल. तसेच बदली व्यक्तीने दिलेली मते स्विकारण्यात येणार नाहीत.

Scanned with CamScanner

१५. **मतदानाची व्यवस्था** :- निवडणुक अधिकारी मतदान केंद्र ठरवुन देईल. तसेच पुरेश प्रमाणात मतदान पेट्या, मतपत्रिका यादीच्या प्रती, मतपत्रीकेवर खुणा करणेसाठी मतदारासाठ साधने आणि मतदान घेण्यासाठी आवश्यक असेल अशी इतर साधन सामग्री व उपसाधने यांच तरतुद करील. संघटनेच्या राज्य कार्यकारिणी (विभागीय उपाध्यक्षा सह), जिल्हा कार्यकारिणी व तालुका स्तरीय कार्यकारिणी या सर्व पदांच्या निवडणूकांचे मतदान हे गुप्त मतदार पध्दतीने करण आवश्यक असल्याने निवडणूक अधिकारी हे त्या-त्या स्तरावर मतदान करण्याचे अनुषंगाने याच ती व्यवस्था करतील. नैसर्गिक आपत्ती व आकस्मितपणे उदभवलेल्या परिस्थितीनुसार निवडणूक अधिकारी निवडणूक प्रत्यक्ष किंवा ऑनलाईन पद्धतीने घेण्याचा निर्णय राज्य कार्यकारिणीच्या सल्याने घेतील.

१६. **मतदान** :- मतदान हे त्यासाठी विहीत केलेल्या वेळेत विहीत पध्दतीने होईल.

१७. **मतमोजणी** :- मतदान समाप्त झालेवर लगेच निवडणुक अधिका-याच्या पर्यवेक्षणाखाली व निर्देशनाखाली मताची मोजणी करण्यात येईल आणि मतमोजणी समाप्त झालेवर निवडणूक अधिकारी मत मोजणीचा निकाल घोषित करून यथोचितरीत्या निवडुन आलेल्या उमेदवारांचे नावे जाहीर करील.

(अ) **जिल्हा कार्यकारिणीस नियुक्ती पत्रे देणे.** घटनेतील निवडणूक उपनियमानुसार निवडू आलेल्या जिल्हा कार्यकारिणीस/सदस्यास नियुक्ती पत्रे राज्य कार्यकारिणी कडून दिली जातील सदरचे नियुक्ती पत्रे प्राप्तीसाठी जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी यांनी जाहीर केलेल्य निकालाची प्रत संबधित जिल्हयाने राज्य कार्यकारिणी कडे त्याच दिवशी किंवा येणा-या पुढील कार्यालयीन दिवशी सादर करणे आवश्यक राहील.

१८. **निवडणुक आक्षेप अर्ज** :- निवडणुकीबाबतचा कोणताही वाद / आक्षेप निवडणुकीचा निका लागल्याचे दिनांकापासुन १० दिवसांचे आत राज्य संघटनेकडे लिखीत स्वरुपात नोंदवावा लागे व अशा वादावर / आक्षेपावर राज्यकार्यकारी मंडळ निर्णय देईल व तो निर्णय अंतिम राहील.

१९. **रिक्त पदे भरणे.** पुरेशा प्रमाणात उमेदवारी अर्ज दाखल न झाल्यामुळे निवडणुकीत रिक्त राहीलेली पदे पदावधी संपण्यापुर्वी पदाधिका-याचा मृत्यु झालेस, त्याने राजीनामा दिलेस किंव इतर काही कारणाने पद रिक्त झालेस अशा पदावर संघटनेची राज्य कार्यकारिणी संघटनेच कोणत्याही पात्र सदस्याला सदर पद धारण करण्यासाठी स्विकृत करून घेवू शकेल व अश स्विकृत पदाधिका-यांच्या / सदस्याचा कालावधी पुढील कमाल **०६ (सहा)** महिण्याकरित असेल. तसेच अशा तात्पुरती नियुक्ती करण्याचा अधिकार राज्य कार्यकारिणीस राहील.

जिल्हा कार्यकारिणीवर किंवा राज्य कार्यकारिणीवर निवडून आलेले पदाधिकारी किंव कार्यकारिणी सदस्य हा पुढील निवडणूक होईपर्यंत किंवा त्याचा मृत्यु होईल त्या दिवसापासुन

Scanned with CamScanner

त्याने धारण केलेले पद रिक्त झाले असे समजण्यात येईल व ते रिक्त पद घटनेच्या नियम ११ नुसार भरण्यात येईल. सेवानिवृत्त झालेल्या पदाधिका-यास किंवा सभासदास जिल्हा/ राज्य कार्यकारिणीवर सल्लागार बनवुन त्याची नियुक्ती घटनेच्या नियम ०९ नुसार राज्य कार्यकारिणी सभेत ठराव पारीत करून घेता येईल.

२०. **दुरुस्ती व निरसन.** या नियमाचे निरसण करण्याचे, यात यथायोग्य दुरुस्त्या करण्याचे किंवा त्यात सुधारणा करण्याचे अधिकार संघटनेच्या राज्य कार्यकारी मंडळास घटना समितीव्दारे राहील.

२१. **राजीनामा.** निवडून आलेल्या कोणत्याही पदाधिका-याने अथवा कार्यकारी सदस्याने आपला विहीत कालावधी संपण्यापुर्वी किंवा पुढील निवडणूकीच्या पुर्वी राजीनामा दिल्यास तो मंजूर करण्याचे अधिकार राज्य / जिल्हा कार्यकारिणीस राहील. तसेच निवडून आलेला पदाधिकारी किंवा कार्यकारिणी सदस्य संघटनेस बाधा येईल किंवा संघटनेच्या हिताविरुध्द कार्यवाही करीत असेल अशा पदाधिका-यास / कार्यकारी मंडळाच्या सदस्यास कार्यकारिणीतुन काढून टाकण्याचे अधिकार संघटना घटना नियम ११ अनुसार राज्य कार्यकारिणी मंडळास राहील.

**समाप्त**

Scanned with CamScanner

प्रमाणित करणेत येते की

या पुस्तिकेमध्ये पान नं. १ ते १३ पाने असून नि संघटनेची घटना पृष्ठ क्र. १ ते १४ पर्यंत व निवडणूक उपनियम भागामध्ये पृष्ठ क्रमांक १ ते ७ आहेत.

बाजीराव देशमुख
राज्याध्यक्ष
शासकिय पुनर्नियुक्त माजी सैनिक
संघटना, महाराष्ट्र राज्य

Scanned with CamScanner